दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८२ ■ शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रुपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -282 ■ Friday, 31 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-



पाहिजेत

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.

संपर्क - ९६२३४८४४८४


# सावधान! साताऱ्यात 'जीबीएस'चे चार तर अकोल्यात पाच संशयित

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

**'जीबीएस'महाराष्ट्रात हळूहळू पाय पसरला लागला आहे. पहिला रूग्ण पुण्यात नंतर आता साताऱ्यात चार तर अकोल्यात पाच संशयित आढळले आहेत. जीबीएस अर्थात गुइलेन बॅरे सिंडोम असा आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणा सतर्कझाली असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.**

सातारा : साताऱ्यामध्ये सध्या जीबीएसचे चार संशयित रुग्ण आढळले आहेत. त्यांच्यावर रुग्णांवर उपचार सुरु आहेत. हे चारही रुग्ण १५ वर्षांच्या आतील मुले आहेत. राज्यामध्ये जीबीएस म्हणजेच (गुलियन बॅरी सिंड्रोमच्या) रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. पुण्यात या आजाराचे सर्वाधिक रुग्ण आहेत. पुण्यासह सांगली, नागपूर अशा अन्य जिल्ह्यांमध्येही 'जीबीएस'चे रुग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर संशयीतांची तपासणी सुरू केल्यावर सातारा जिल्ह्याम ध्ये या आजाराचे चार संशयित रुग्ण आढळल्याची माहिती समोर आली आहे.

एकूण चार रुग्णांपैकी दोन रुग्णांवर साताऱ्यातील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. एक रुग्ण खासगी रुग्णालयात, एक रुग्ण कराडच्या कृष्णा रुग्णालयात असल्याची माहिती समोर आली आहे. या चारही मुलांची प्रकृती व्यवस्थित असल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे. प्रयोग शाळेतील वैद्यकीय तपासणीनंतर जीबीएसचे निदान स्पष्ट होईल. दूषित पाणी आणि अन्न यांमुळे हा आजार होतो. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे जिल्हा आरोग्य अधिकारी महेश खलीपे यांनी म्हटले आहे.

## 'जीबीएस'ची अकोल्यात धडक एक रुग्ण व्हेंटिलेटरवर

**अकोला :** जीबीएस अर्थात 'गुइलेन-बॅरे सिंड्रोम' या दुर्मिळ आजाराने आता अकोल्यात धडक दिली आहे. या आजाराचे पाच रुग्ण जिल्ह्यात आढळले असून त्यांच्यावर सर्वोपचार रुग्णालयात उपचार केले जात आहेत.

एक रुग्ण व्हेंटिलेटरवर असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. हा आजार संसर्गजन्य नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

सध्या राज्यभरात जीबीएस आजाराचे थैमान सुरू आहे. पुण्यानंतर राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये या आजाराचे लोण पसरले. अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात जीबीएसच्या पाच रुग्णांवर उपचार सुरू असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. यातील चार रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. एका रुग्णावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्या रुग्णाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. या रुग्णाची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

> वैद्यकीय शासकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये जीबीएस अर्थात 'गुइलेन-बॅरे सिंड्रोम' या दुर्मिळ आजाराच्या पाच रुग्णांवर उपचार केले जात आहेत. यातील चार रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर सामान्य वार्डात उपचार सुरू आहेत. एका रुग्णावर अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर उपचार केले जात आहेत.
>
> **– डॉ. मीनाक्षी गजभिये,**
> अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला.

या आजाराच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली. या आजाराची लक्षणे आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हा आजार करोनासारखा संसर्गजन्य नाही, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये तर खबरदारी घ्यावी. योग्य काळजी घेतल्यास जीबीएस आजारापासून आपण दूर होऊ शकतो.

बाहेरचे खाद्यपदार्थ खाल्ल्यास, तसेच बाहेरचे पाणी पिल्यास जीबीएसची लागण होण्याची शक्यता जास्त असते. अचानकपणे हाता, पायात, अंगात अशक्तपणा जाणवत असेल किंवा कोणतीही लक्षणे आढळल्यास अंगावर न काढता त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. तसेच जास्त काळ आलेला ताप, खोकला, उलट्या, जुलाब, असा त्रास झाल्यास त्वरित चाचण्या करून घेण्यात याव्यात, वैद्यकीय सल्ल्याशिवाय कोणतेही औषधोपचार घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या आजाराची लक्षणे आढळतात त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

## कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीची न्यायालयीन चौकशी; आयोगाला महिन्याची मुदत



**लखनौ –** महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने तीन सदस्यांच्या न्यायिक आयोगाची स्थापना केली आहे. हा आयोग आज, शुक्रवारी घटनास्थळी भेट देईल. या घटनेच्या चौकशीसाठी आयोगाला महिन्याची मुदत देण्यात आली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश हर्ष कुमार या आयोगाचे प्रमुख आहेत. त्यांच्याखेरीज माजी पोलीस महासंचालक व्ही. के. गुप्ता आणि निवृत्त आयएएस अधिकारी डी. के. सिंह यांचा या पॅनेलमध्ये समावेश आहे. आयोगाने गुरुवारी कामाला सुरुवात केली. 'आयोगाकडे चौकशी पूर्ण करण्यासाठी महिनाभराचा वेळ आहे. मात्र, चौकशी अधिक जलद करू,' अशी प्रतिक्रिया कुमार यांनी दिली.

**सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल –** भाविकांच्या सुरक्षेसाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि नियमांची अंमबजावणी व्हावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी जनहित याचिका दाखल करण्यात आली.

**गर्दीच्या व्यवस्थापनाची चोख तयारी**

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर उत्तर प्रदेश सरकारने गर्दीच्या व्यवस्थापनासाठी आणि भाविकांच्या सुरक्षेसाठी अधिक कसून तयारी केली आहे. येत्या वसंत पंचमीला अमृत स्नान होत आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असल्याचे महाकुंभमेळ्यासाठी नियुक्त पोलीस उपमहानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी सांगितले.

## राज्यात आणखी एक 'जीबीएस' चा बळी!

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कोरोनानंतर आता राज्यात 'जीबीएस'व्हायरसची दहशत निर्माण झाली आहे. 'जीबीएस' ने पुण्यात थैमान घातले आहे. आज पुण्यातील 'जीबीएस'बाधित रुग्णांची संख्या १२७ पर्यंत पोहचली आहे. जीबीएस आजारामुळे राज्यात दुसरा बळी गेलाय. पहिला मृत्यू सोलापूरमध्ये झाला होता, तर दुसरा मृत्यू पुण्यात झाला आहे. पुण्यात बुधवारी 'जीबीएस'बाधित असलेल्या एका ५६ वर्षीय महिलेचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. राज्यात जीबीएसची रुग्णसंख्या आता १२७ झाली असून, त्यातील २० जण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यातील रुग्णांमध्ये २३ रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रातील असून, ७३ रुग्ण हे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील आहेत.

**'हा' आजार होण्यामागचे कारण ??**

हा आजार स्पर्शाने किंवा एकमेकांचं उष्ट खाल्ल्याने होत नसून हा आजार दूषित पाण्यामुळे होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. आतापर्यंत आढळलेल्या रुग्णांची व्यवस्थित चौकशी केल्यानंतर कूपनलिका तसेच विहिरीतून मिळणाऱ्या दूषित पाण्यामुळे हा आजार संभवतो असल्याचे समजते आहे. या पार्श्वभूमीवर गुलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) साथ आटोक्यात आणण्यासाठी महापालिकेकडून २५ हजार घरांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. तसेच नागरिकांना पाणी उकळून व गाळून घेणे, बाहेरील अन्नपदार्थ टाळणे याबाबत आवाहनही करण्यात येत आहे.

## अन्यथा १ फेब्रुवारीपासून UPI पेमेंट करता येणार नाही, करावा लागणार महत्त्वाचा बदल

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने काही दिवसांपूर्वी आपल्या नियामांमध्ये मोठा बदल केला आहे. या बदलानुसार आता यूपीआय आयडीमध्ये कोणतेही स्पेशल कॅरेक्टर देता येणार नाही. या प्लॅटफफॉर्मने स्पष्ट केले की आता १ फेब्रुवारी २०२५ नंतर यूपीआय आयडी किंवा ट्रांजेक्शन आयडीमध्ये स्पेशल कॅरेक्टर्स असतील (ऽ, !, किंवा ॐ) तर ते पेमेंट फेल होईल. जर तुमच्या यूपीआय आयडीमध्ये स्पेशल कॅरेक्टर्स असतील तर तुम्हाला तात्काळ बदल करावा लागणार आहे.

गेल्या ९ जानेवारी रोजी एनपीसीएलने एक सर्कुलर जारी केले होते, ज्यामध्ये नव्या नियमांबद्दल माहिती देण्यात आली होती. यामध्ये स्पष्ट करण्यात आले होते की यूपीआय ट्रांजेक्शन आयडी फक्त अल्टान्यूमेरिक असू शकतो. म्हणजेच त्यामध्ये फक्त क्रमांक आणि अक्षरे असतील आणि कोणतेही स्पेशल कॅरेक्टर देण्यात आलेले नसेल. जर ट्राजेक्शन आयडीमध्ये स्पेशल कॅरेक्टर असेल तर सिस्टम आपोआप पेमेंट रिजेक्ट करेल.

## दिल्लीत मोठी घडामोड; पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या घरावर निवडणूक आयोगाची धाड, 'आप'चा आरोप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस उरले असताना राजधानी दिल्लीत राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे. यमुना नदीच्या अस्वच्छ पाण्यावरून शेजारचे हरियाणा राज्य या निवडणुकीत ओढले गेले असताना आत पंजाबलाही यात ओढले गेले आहे. पंजाबचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे नेते भगवंत मान यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी निवडणूक आयोगाने धाड टाकली असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. दरम्यान निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनीही आपली बाजू मांडली आहे. पैसे वाटल्याचा आरोप झाल्यामुळे भरारी पथकाने कपूरथाला निवासस्थानी धडक दिली होती. मात्र त्यांना घरात येऊ दिले नाही.

निवडणूक अधिकारी ओ. पी. पांडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, इथून पैसे वाटप होत असल्याची तक्रार आम्हाला मिळाली होती. १०० मिनिटांच्या आत आम्हाला तक्रारीचे निवारण करायचे असते. आयोगाचे भरारी पथक येथे तपासणीसाठी आले होते. मात्र त्यांना आत जाऊ दिले नाही. त्यामुळेच मला यावे लागले. भरारी पथकाला कॅमेऱ्यांसह आत जाऊ द्यावे, अशी विनंती आम्ही केली आहे.

सीव्हीजील ॲपवरून तक्रार प्राप्त झाल्याचेही पांडे यांनी म्हटले. निवडणूक आयोगाच्या या कारवाईनंतर आता 'आप'कडून जोरदार पलटवार करण्यात येत आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले की, भाजपाचे नेते पैसे आणि भेटवस्तू मतदारांना वाटत असताना त्यांना मोकळे सोडून पंजाबच्या मुख्यमंत्र्यांवर धाड टाकण्याचे कारण काय? हे मला समजत नाही. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही एक्सवर पोस्ट टाकत या घटनेचा निषेध केला आहे. ङदिल्ली पोलिसांच्या समवेत निवडणूक आयोगाने माझ्या दिल्लीतील निवासस्थानी धाड टाकली. दिल्लीत भाजपाचे नेते राजरोस पैसे वाटप करत आहेत. पण हे पोलीस आणि निवडणूक आयोगाला दिसत नाही. पण आमच्यावर मात्र कारवाई करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## कॉ. गोविंद पानसरे हत्याप्रकरणी सहा जणांना जामीन मंजूर!

**न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत; पुरोगाम्यांचा दबाव दूर करण्यासाठी पानसरे खटला कोल्हापूर जिल्ह्याबाहेर चालवा !**

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई उच्च न्यायालयाने आज कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणी अटकेत असलेल्या ६ जणांना जामीन दिला. या निर्णयाचे समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना मनापासून स्वागत करत आहेत. 'हिंदु दहशतवादा'ची थियरी सिद्ध करण्यासाठी पद्धतशीरपणे 'फेक नॅरेटिव्ह' निर्माण केला गेला आणि पुरोगाम्यांच्या हत्यांच्या प्रकरणांमध्ये हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना अडकवण्यात आले. पानसरे कुटुंबीय, तसेच अन्य तथाकथित पुरोगाम्यांनी या प्रकरणी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना जामीन मिळू नये, यासाठी खूप आटापिटा केला होता. सातत्याने माध्यमांसमोर दिशाभूल करणारी भूमिका मांडून न्यायालय आणि पोलीस यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत होते. हा खटला लांबवण्याचा प्रयत्न करत होते. या खटल्यात कोल्हापूरमध्ये पानसरे कुटुंबीय आणि पुरोगामी वापरत असलेले दबावतंत्र लक्षात घेता हा खटला यापुढेही कोल्हापूर येथे चालवला गेला, तर न्याय मिळण्यात अडचण निर्माण केली जाईल, असे आम्हाला वाटते. त्यामुळे आम्ही समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने न्यायालयाकडे विनंती करत आहोत की, पानसरे हत्या प्रकरणाचा खटला कोल्हापुरात न चालवता त्रयस्थ ठिकाणी चालवावा, अशी भूमिका सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी मांडली.

पाकिस्तानातून आलेल्या आतंकवादी अजमल कसाबला आतंकवादाच्या घटनेत वकील दिला जातो; मात्र गरीब घरातील या हिंदू मुलांना वकील मिळू न देता तुरुंगात सडवण्याचा प्रयत्न हे पुरोगामी करत होते. एकीकडे न्याय मिळावा, असा टाहो फोडणारे पानसरे कुटुंबीय 'हा खटलाच चालवू नये', यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जाऊन याचिका करून खटला लांबवत होते. पण आज या सर्व हिंदुत्वनिष्ठांना तब्बल सहा वर्षांनी जामीन मिळाला, याबद्दल आम्ही ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करतो, असे श्री. अभय वर्तक म्हणाले.

## परभणीत ६५ कोटीचा बोगस पीक विमा उचलला, गुन्हा दाखल करण्याची खासदार जाधव यांची मागणी

**परभणी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील गंगाखेड, पालम, सोनपेठ व जिंतूर या चार तालुक्यातील महसूल मंडळात अस्तित्वात नसलेल्या गावांचा पिकविमा काढून जवळपास ६५ कोटींचा बोगस पिकविमा उचलल्याचा प्रकार घडला आहे. या बोगस पिकविमा प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह पीक विमा उचलणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी खासदार संजय जाधव यांनी केली आहे. महसूल मंडळ व कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रूपयाचा बोगस पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषीवर कारवाई न केल्यास या प्रकरणी आपण उग्र आंदोलन करू असेही ते म्हणाले.



परभणी जिल्ह्यातील १७ गावाला महसूल मंडळ नसतानाही खरीप हंगामातील २६ हजार १४९ हेक्टरवरील पिक नुकसानीचा पिकविमा महसूल व कृषि विभागाने दाखवून कोट्यवधी रूपयाचा पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याचे यावेळी खासदार जाधव यांनी नमूद केले. बोगस पिकविमा तयार करणारा झारीतील शुक्राचार्य कोण आहे याचा शोध घेऊन हे प्रकरण सरकारने गांभीर्याने घ्यावे याकडे खासदार जाधव यांनी लक्ष वेधले आहे.

संगमनेर तालुक्यातील आश्वी येथे अप्पर तहसील कार्यालय

परभणी जिल्ह्यात खरीप हंगामाचा पिकविमा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर भरला होता. तसेच प्रशासनाने अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या महसूल मंडळनिहाय सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, सोनपेठ, पालम या तालुक्यातील काही गावे महसूल मंडळात नसतानाही पिकविमा देण्यात आला आहे. यामध्ये गंगाखेड तालुक्यातील आनंदनगर ५२४८.९९ हे., जिंतूर तालुक्यातील अंगलगव्हाण तांडा ४९३.१६ हे., केहाळ तांडा ६२.९५ हे., लिंबाळा ५५२.११ हे., पोखर्णी तांडा ८६१.३९ हे., सेवालाल नगर १४५.१ हे., तेलवाडी ८३३.६ हे., पालम तालुक्यातील मौजमाबाद तांडा १०००.२५ हे., रामपुर तांडा ३७८१.२५ हे., सोनपेठ तालुक्यातील भाऊचा तांडा २९१२.२७ हे., कौथळा तांडा ३९९.९५ हे., मनशिराम तांडा १०९०.२९ हे., रेवा तांडा ३६२५.३९ हे., सखाराम तांडा ९१२.६८ हे., सोनपेठ १३७७.४४ हे., सोनपेठ २३०६.८१ हे., तुकाई तांडा ५४६.३३ हेक्टर असे एकूण २६ हजार १४९ हेक्टरवरील पिकविमा दाखवून जवळपास ६५ कोटी रूपयांचा बोगस विमा उचलण्यात आला आहे असे खासदार जाधव यांनी सांगितले. महसूल मंडळ व कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रूपयाचा बोगस पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी खासदार जाधव यांनी केली आहे.

# अर्थसंकल्प आणि अर्थचित्र

एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आर्थिक वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प मांडणार आहेत. गेल्या तिमाहीमध्ये देशाचा उत्पादनवृद्धीचा म्हणजेच जीडीपीचा दर ५.४ टक्क्यांपर्यंत खाली आला होता. भारतातील मध्यमवर्गाचा प्रचंड विस्तार झाला असून या वर्गाकडून बाजारपेठेतील वस्तूंची मागणी कमी नोंदवली गेली. साबण, तेल, पाव, अंडी, दूध अशा सर्व वस्तू महाग झाल्या आहेत. त्या परवडेनाशा झाल्याने एकूण मागणी घटली. त्यामुळे यावेळी अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांवरील करांचे ओझे कमी केले जाण्याची शक्यता आहे. वार्षिक उत्पन्न १५ लाख रुपये असलेल्यांवरील कर कमी करण्याचा विचार केला जाऊ शकतो. शिवाय करदात्यांच्या हातात अधिक खर्च करण्यायोग्य पैसे शिल्लक राहावेत म्हणून मूलभूत सूटमर्यादा ५० हजार रुपयांपर्यंत वाढवायला हवी. ज्येष्ठ नागरिकांसाठी करसवलतीची मर्यादा वाढवणे जरुरीचे आहे. तसेच प्राप्तिकर कायद्याच्या कलम २४ अंतर्गत गृहकर्जावरील व्याजावर असलेली दोन लाख रुपयांची सूट मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत वाढवण्यास हरकत नाही. कलम ८० डी अंतर्गत ६० वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना आरोग्य विम्याच्या प्रीमियमवर २५ हजार रुपये तर ज्येष्ठ नागरिकांना ५० हजार रुपयांची वजावट मिळते. ही मर्यादा अनुक्रमे ५० हजार आणि ७५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्यास हरकत नाही. तसे झाल्यास सामान्यांचा आरोग्यावरील खर्चाचा ताण कमी होईल. सरकारने प्राप्तिकर अधिक सुटसुटीत गेला पाहिजे. मागच्या अर्थसंकल्पात सरकारने रोजगारासाठी प्रधानमंत्री योजना सुरू केली होती. या वेळच्या अर्थसंकल्पात देखील बेकारी कमी करण्यासाठी काही ना काही उपाय योजावे लागतील. अपेक्षित विकासदर साध्य न झाल्याने देशात रोजगारनिर्मितीचा वेगही मंदावला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताच 'मेक अमेरिका ग्रेट' आणि 'अमेरिका फर्स्ट' अशा घोषणा दिल्या आहेत. ट्रम्प यांच्या दुसऱ्या पर्वात भारत-अमेरिका संबंध आणखी वरील टप्प्यावर पोहोचतील, अशी अपेक्षा भारतीय उद्योगपतींनी व्यक्त केली आहे. परंतु, ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर सणसणीत कर किंवा शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. त्याचा अमेरिकेत केल्या जाणाऱ्या भारताच्या निर्यातीला फटका बसू शकतो. मग भारतातील रोजगारावरही प्रतिकूल परिणाम होईल. हे विचारात घेऊन अर्थमंत्र्यांना अगोदर पूर्वतयारी करून ठेवावी लागेल. रोजगारनिर्मितीचा विचार करताना डिजिटल क्रांतीमुळे होणाऱ्या बदलांचा विचार करावा लागेल. या क्रांतीमुळे अकाउंटिंग, वित्तीय, कायदेशीर अशा अनेक व्यावसायिक सेवा दूर बसून करता येऊ लागल्या आहेत. बाहेरच्या देशांमधील अशी अनेक कामे भारतातून केली जातात. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेत नवनवीन क्षेत्रांमध्ये संधी निर्माण झाली आहे. जगामध्ये एकूण निर्यात उलाढालीच्या ४२ टक्के वाटा हा सेवाक्षेत्राचा आहे. त्यामध्ये डीडीएस अर्थात डिजिटली डिलिव्हर्ड सर्व्हिसेसचा हिस्सा ५६ टक्के आहे. येत्या पाच वर्षांमध्ये हा वाटा ६६ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. आता तर इंजिनीअरिंग, डिझाइन, लॅब असिस्टंट, पॅरामेडिक्स, योग प्रशिक्षक, ट्यूशन शिक्षक, देखभाल तंत्रज्ञ अशा अनेक सेवा या डीडीएसच्या माध्यमातून दिल्या जात आहेत. भारतातल्या भारतात बसून या सेवा देऊन लाखो तरुणांना स्वावलंबी बनवता येईल. परंतु, यासाठी त्यांच्यातील कौशल्यांचा दर्जा वाढवावा लागेल. अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांचा दर्जा सुमार असून तेथून शिकून तयार झालेली तरुण-तरुणी हे उत्तम दर्जाचे काम करू शकत नाहीत, असा अनुभव आहे. हा दर्जा कसा वाढेल, हे सरकारने पाहिले पाहिजे. आज गुरुग्राममधून नॉर्वेमधील एखाद्या गोदामाची देखरेख ड्रोनच्या माध्यमातून केली जाऊ शकते. नवी दिल्लीमध्ये बसलेले लोको ड्रायव्हर्स ब्रिटनमधील लोकोमोटिव्हज देखील ऑपरेट करू शकतात किंवा हैदराबादमध्ये बसलेले मेंटेनन्स इंजिनीअर्स हे जगातील कुठल्याही भागात असलेल्या कारखान्यांमधील कामाचे नियंत्रण करू शकतात. त्यामुळे लहान लहान शहरांमध्ये असलेल्या विद्यापीठांमधून असे कोर्सेस सुरू केले पाहिजेत, जे डिजिटल डिलिव्हर्ड सर्विसेस उद्योगासाठी उपयुक्त ठरू शकतील. हे कोर्सेस पूर्ण करणाऱ्या व्यक्ती डीडीएस उद्योगात नोकरी-व्यवसाय करू शकतील. अशाच शहरांमधून डीडीएस संकुले निर्माण करता येतील. अशा ठिकाणी कमी खर्चामध्ये देश-विदेशातील कंपन्यांना डीडीएस सेवा देता येतील, त्याचप्रमाणे ग्लोबल केपेबिलिटी सेंटर्ससाठीही काम करता येईल. मोठ्या शहरांपेक्षा लहान शहरांमध्ये खर्च कमी येईल आणि अशा सेवांना मग विदेशातून जास्त मागणी येईल. भारतातील औद्योगिक धोरणांचा भर मोठ्या कंपन्यांवर असतो. परंतु, मध्यम आकाराच्या म्हणजेच शंभर ते एक हजार कोटी रुपये इतक्या वार्षिक उलाढालकक्षेत असलेल्या कंपन्यांमधून होणारी निर्यात ही जास्त आहे. जर्मनी, जपान, फ्रान्स, इटली या देशातील क्षेत्रातच जास्त प्रमाणात रोजगार तयार होतो. चीनने 'लिटल जायंट्स' या नावाने अशा मध्यम आकाराच्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित करून मोठी मजल मारली आहे.

# मूकनायक : बहुजनांवरील अन्यायाचा टाहोऽऽऽ..



**मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे. अशा ज्ञानवर्धक माहितीसह वाचा, श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी यांचा हा लेख... संपादक.**

**विश्वरत्न** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले मराठी भाषेतील मूकनायक हे एक पाक्षिक आहे. इथूनच त्यांच्या न्याय्य पत्रकारितेस खरीखुरी सुरूवात झाली. ते पाक्षिक त्यांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केले होते. दि.३१ जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादक केले. कारण डॉ.आंबेडकर हे त्यावेळी सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांना उघडपणे संपादक पदावर कार्य करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती. पहिल्या अंकातील मनोगत नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता. पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले. मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ हजार ५ शे रुपयांची आर्थिक मदत दिली होती. आंबेडकरांनी मूकनायक मराठी भाषेमध्ये प्रकाशित केले, कारण मराठीच त्याकाळी सामान्य जनतेची भाषा किंवा लोकभाषा होती आणि बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र- कर्मभूमी महाराष्ट्र होते. तसेच तेव्हा महाराष्ट्रातील दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीच समजू शकत होती. मूकनायकच्या पहिल्या अंकात हा मजकूर होता, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही.'

विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले दोन पाक्षिके मूकनायक व बहिष्कृत भारत हे होत. बाबासाहेब म्हणाले होते, 'कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते.' या पाक्षिकाने अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण केली व त्यांना आपल्या अधिकारांची जाणिव निर्माण करून दिली. मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली म्हणून जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अंभगाच्या ओळी छापल्या जात असत- 'काय करू आता धरुनिया भीडें निशंक हे तोंड वाजविलें १ नव्हे जगी कोणा मुकियाची जाणें सार्थक लाजोनी नव्हे हितें २' मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे. दि.५ जुलै १९२० रोजी बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. त्यानंतर दि.३१ जुलैपासून मूकनायकाचे संपादक पद ज्ञानेश्वर ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे आले.

पहिल्या अंकाच्या संपादकीयमध्ये जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली होती- 'आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या इतर वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना पर्वा नसते.

इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच, की कोणतीही एखादी जात अवनत झाली, तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे, म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रकारांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये.' सद्यस्थितीत मूकनायकाचे १९ अंक उपलब्ध आहेत. त्यांत डॉ.आंबेडकरांनी वैचारिक लिखाण केलेले आढळते. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली.

सदर पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. मात्र काही अपरिहार्य कारणास्तव मूकनायक हे एप्रिल १९२३मधे बंद पडले. जरी ते बंद पडले असले तरी ते बहुजन समाजाला आपल्यावरील अन्यायाचा टाहो असा फोडून संबंधितांचे लक्ष वेधता येते, ही शिकवण व प्रखर पत्रकारितेचे विविध पैलू उलगडून दिले. त्याची फलश्रुती म्हणजे आज निर्माण झालेले सर्व समाजातील असंख्य प्रज्ञावंत पत्रकार होत. जय भीम, जय शिवराय, जय जोती, जय क्रांती!

!! मूकनायक पाक्षिकाच्या आरंभ दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# गिरीजन- हरिजनांची मने जिंकणारे महात्मा गांधी

**अंतिम भाग**

मागील अंकावरून पुढे....

जर्मनांचा पराभव होऊन पहिले जागतिक युद्ध सन १९१८ साली संपले; ब्रिटन विजयी झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुसलमानांची खिलाफत तोडून तिचे अनेक भाग केले. भारतातील मुसलमान त्यामुळे संपप्त झाले. ब्रिटिश सरकारने मॉंटग्यू-चेम्सफर्ड समिती भारताच्या राजकीय हक्कांसंबंधी शिफारशी करण्याकरिता नेमली. त्यात स्वराज्याचे हक्क नव्हतेच. लोकप्रतिनिधींची कायदेमंडळे व द्विदल राज्यपद्धती देण्याचे मात्र ठरले; परंतु गव्हर्नरांचे व केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकार कायम ठेवले. भारतात असंतोष पसरत होता. तो दाबून टाकण्याकरिता न्यायमूर्ती रौलट याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशींप्रमाणे दडपशाहीचा कायदा केंद्र सरकारने मंजूर केला. या कायद्याच्या विरुद्ध गांधींनी सत्याग्रहाची चळवळ उभारली. गांधींनी भारतभर दौरा सुरू केला. दि.६ एप्रिल १९१९ रोजी देशभर हरताळ पाळण्यात आला. हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये प्रचंड एकजूट घडून आली. पंजाब सरकारने पंजाबमध्ये शिरण्याची गांधींना मनाई केली. पंजाब सरकारने त्यांना अटक करून परत मुंबईला पाठविले. देशभर हाहाकार उडाला. जालियनवाला हत्याकांडामुळे गांधींनी सुरू केलेला सत्याग्रह तात्पुरता तहकूब केला. कॉंग्रेसने पंडित मदनमोहन मालवीय, मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, उमर सोमानी इत्यादिकांची पंजाबात अथवा अन्यत्र झालेल्या अत्याचारांच्या चौकशीकरिता दि.१४ ऑक्टोबर १९२१रोजी सरकारने लॉर्ड हंटर यांच्या अध्यक्षतेखाली पाच गोरे व तीन हिंदी गृहस्थ यांची समिती नेमली. या समितीपुढे सत्याग्रहाचे प्रवर्तक म्हणून गांधींचीही साक्ष झाली. कॉंग्रेस समितीने असा निर्णय दिला, की लोकांना हिंसक मार्गापासून परावृत्त करण्याकरिता हरताळ पाळण्यात आला होता. सत्याग्रहाची चळवळ हे सरकारविरुद्ध बंड होते; परंतु सरकारच्याही हातून अन्याय झाले, अशी कबुली हंटर समितीने दिली. सन १९२० साली नागपूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले; त्यात असहकारितेचे आंदोलन सुरू करण्याचा ठराव मान्य करण्यात आला. खिलाफतीचे पुनरुज्जीवन करण्याची चळवळही याच चळवळीबरोबर उभारली. देशभर सभा, मिरवणुका, प्रभात फेऱ्या निघू लागल्या. कायदेमंडळांवर देशातील शेकडो प्रतिनिधींनी बहिष्कार घातला. हजारो लोकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या. अनेक वकिलांनी व बॅरिस्टरांनी वकिलीची कामे सोडली. परदेशी मालावर व ब्रिटिश कापडावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन देशभर पसरले. राष्ट्रीय शिक्षणाच्या खाजगी संस्था स्थापण्यात आल्या. परंतु ब्रिटिश सरकारने दडपशाही सुरू केली. लक्षावधी लोकांना कारावासात टाकले. गांधींनी या अत्याचारी असहकारितेची शेवटची पायरी म्हणून सामुदायिक कायदेभंग व करबंदी करण्याच्या चळवळीचा संकल्प सोडला. बार्डोली तालुक्यात ही चळवळ सुरू करावयाचे ठरविले. गांधींनी बार्डोली येथेच आपला मुक्काम ठेवला. परंतु उत्तर प्रदेशात चौरीचौरा येथे दंगे होऊन लोकांनी जाळपोळ केली व त्यात पोलिसांची हत्या झाली. त्यामुळे गांधींनी कॉंग्रेसच्या मुख्य कार्यकारिणीची बार्डोली येथे दि.११ व १२ फेब्रुवारी १९२२ रोजी बैठक बोलावून बार्डोलीचा सत्याग्रह तहकूब ठेवला. महात्मा गांधींना त्यानंतर १० मार्च रोजी अहमदाबाद येथे पकडण्यात येऊन राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात आली. गांधींनी न्यायालयापुढे आपण राजद्रोह केला हे मान्य केले व सांगितले, ब्रिटिश राज्यपद्धती आणि तिचा कायदा हा भारतीय जनतेच्या हिताच्या विरुद्ध आहे. मी बादशहाविरुद्ध अप्रीती उत्पन्न केली नाही, तर ब्रिटिशांच्या राज्यपद्धतीविषयी अप्रीती उत्पन्न केली आहे. अशी अप्रीती उत्पन्न करणे हे कर्तव्य व सद्गुणाचे दर्शन मी समजतो. न्यायाधीश ब्रुमफील्ड यांनी निकाल देताना सांगितले: तुमचे ध्येय उच्च व तुमचे वर्तन थोर साधूला शोभण्यासारखे आहे. परंतु तुमच्या सत्याग्रहाचा उद्देश उच्च व प्रयत्न अत्याचाराविरुद्ध असले तरीही अत्याचार घडले; म्हणून तुम्हास मोठ्या खेदाने मला शिक्षा सुनवावी लागत आहे. सहा वर्षांच्या साध्या कैदेची शिक्षा मी फर्मावितो. येरवडा जेलमध्ये गांधींना रवाना केले. तेथे सन १९२४ साली त्यांचा आंत्रपुच्छशोथ हा विकार बळावला; त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. ५ फेब्रुवारीला त्यांना मुक्त करण्यात आले. त्यानंतर गांधींनी ब्रिटिश राज्यकर्त्यांशी लढा न करता, सामाजिक सुधारणांसारख्या विधायक कार्यक्रमास वाहून घेतले. मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, विठ्ठलभाई पटेल इ. कॉंग्रेस नेत्यांनी स्वराज्य पक्ष स्थापून कायदेमंडळात स्वराज्याच्या हक्कांकरिता झगडायचे ठरविले. हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, खादीग्रामोद्योग, गावसफाई इ. कार्यक्रम गांधींनी हाती घेतले. गांधींनी देशभर प्रवास करून प्रचार केला. राजगोपालाचारी, जवाहरलाल नेहरू हे गांधींच्याच विधायक कार्यक्रमात सहकार्य करू लागले आणि गांधींच्या कार्यक्रमाचे ते समर्थक बनले. कॉंग्रेसमधील एमब.आ.जयकर, न.चिं. केळकर, मदनमोहन मालवीय इ.मंडळी, मुसलमानांचे मन वळविणे अशक्य आहे, असे म्हणून हिंदू महासभेकडे वळली. कॉंग्रेसमधील अनेक मुसलमान नेते, बॅ.जिना, सर अली इमाम यांनी डिसेंबर १९२५मध्ये अलीगढ येथे मुस्लिम लीगचे अधिवेशन भरवून मुसलमानांची फळी उभी केली. भारतातील राजकीय असंतोष केंद्राच्या व प्रांतांच्या विधिमंडळांत शिरलेल्या स्वराज्य पक्षाच्या द्वारे वारंवार प्रकट होऊ लागला; हे पाहून नवे आंदोलन उद्भवण्याच्या अगोदरच राजकीय स्वयंनिर्णयाचे हक्क वाढवावे, म्हणून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सायमन आयोग नेमण्याचे ठरविले. दि.३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन आयोग मुंबई बंदरात उतरला. तेव्हापासून त्याविरुद्ध निदर्शने सुरू झाली. देशभर ब्रिटिशविरोधी निदर्शनांचे थैमान सुरू झाले. कॉंग्रेसने सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. लाहोरला लाला लजपतराय व लखनौला जवाहरलाल नेहरू यांच्यावर उग्र निदर्शने चालू असताना लाठीहल्ला झाला. लाला लजपतराय या लाठीहल्ल्याने उत्पन्न झालेल्या दुखण्यातच कालवश झाले. भारताचे राजकीय वातावरण तप्त झाले, हे पाहून पंडित जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांनी कॉंग्रेसचे उद्दिष्ट संपूर्ण स्वातंत्र्य जाहीर करण्याचे ठरविले. गांधी साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे समर्थक होते. या दोघांना त्यांनी आश्वासन दिले, की दि.३१ डिसेंबर १९२९पर्यंत साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळाले नाही, तर मी संपूर्ण स्वातंत्र्यवाला होईन. त्याच सुमारास भगतसिंग इ.सशस्त्र क्रांतिकारकांच्या हालचाली सुरू झालेल्या गांधींच्या लक्षात आल्या. लॉर्ड आयर्विन यांच्या आगगाडीखाली नवी दिल्ली स्टेशनजवळ बॉंबस्फोट झाला. भारताच्या राजकीय चळवळीला हिंसक वळण मिळणार असे दिसू लागले. ते टाळण्याकरिता गांधींनी १९३० साली सविनय कायदेभंगाची घोषणा केली. १२ मार्च १९३० रोजी सकाळी ६.३० वाजता साबरमती आश्रमातून गांधींनी स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही; अशी प्रतिज्ञा करून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रही वीरांसह यात्रा सुरू केली. ६ एप्रिलला यात्रा संपली. गांधींनी बेकायदेशीर रीतीने मीठ गोळा केले. देशभर मिठाचा कायदा मोडणारे सत्याग्रह आंदोलन उभे राहिले. दि.४ मे १९३० रोजी पहाटे गांधींना कराडी या गावी अटक झाली; येरवड्याच्या तुरुंगात सरकारने त्यांची रवानगी केली. देशामध्ये लक्षावधी लोक कायदेभंग करून कारावासाची शिक्षा भोगू लागले. दि.२५ जानेवारी १९३१ रोजी शांततामय वातावरण निर्माण करण्याकरिता लॉर्ड आयर्विन यांनी गांधींची बिनशर्त सुटका केली. गांधी आणि आयर्विन यांच्यात वाटाघाटी सुरू होऊन दि.५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार झाला. भारताच्या राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काचा प्रश्न चांगल्या रीतीने सोडविण्याकरिता इंग्लंडमध्ये नोव्हेंबर १९३१ मध्ये भारतीय प्रतिनिधींची गोलमेज परिषद भरली. गांधी त्या परिषदेस उपस्थित राहिले. इंग्लंडमध्ये त्या वेळी कमरेला पंचा, अंगावर उबदार साधी शाल व पायात वहाणा असा त्यांचा पोषाख होता. गोलमेज परिषदेमध्ये भाषण करताना गांधींनी सांगितले, की ब्रिटिश प्रजाजन म्हणविण्यात मला एके काळी अभिमान वाटत होता; आता बंडखोर म्हणून घेणे मला जास्त आवडेल. हिंदू, मुसलमान, स्पृश्य व अस्पृश्य यांना विभक्त मतदार संघ द्यावे की नाही याबद्दल तेथे हिंदी प्रतिनिधींमध्ये मतभेद झाले. अशा प्रकारची जातीयता स्वराज्यात राहू नये, त्याकरिता प्राण गेले तरी चालतील, असे गांधींनी त्या परिषदेत निकराने जाहीर केले. भारतात आल्यावर ३ जानेवारी १९३१ रोजी गांधींना अटक झाली. त्यानंतर वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, राजेंद्रबाबू, सुभाषचंद्र बोस, डॉ. अन्सारी, आझाद, कस्तुरबा, कमला नेहरू इ. राष्ट्रीय नेत्यांना ब्रिटिश सरकारने अटक करून त्यांची कारागृहात रवानगी केली. १८ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी डॉ. भी. रा. ऊर्फ बाबासाहेब आंबेडकरांच्या आग्रहावरून अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ दिल्याचे जाहीर केले. हे ऐकल्यानंतर गांधींनी २० सप्टेंबर रोजी या प्रश्नावर प्राणांतिक उपोषण सुरू केले. डॉ. आंबेडकरांशी त्यांनी वाटाघाटी केल्या. तारीख २६ रोजी गांधींचा जीव वाचविण्याकरिता डॉ. आंबेडकरांनी तडजोड केली व येरवडा करार झाला. ८ मे १९३३ पासून त्यांनी पापाचे प्रायश्चित म्हणून २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. सरकारने त्यांची लगेच मुक्तता केली. १२ जुलै १९३३ रोजी गांधींनी सामुदायिक सत्याग्रहाचे आंदोलन मागे घेतले; परंतु त्यांनी १९३४ मध्ये वैयक्तिक कायदेभंग सुरू केला. त्यातही पुन्हा त्यांना एक वर्षाची कैदेची शिक्षा झाली. परंतु पुन्हा उपोषण सुरू केल्यामुळे सरकारने त्यांची काही दिवसांनी मुक्तता केली. जानेवारी १९३४ मध्ये बिहार येथे भयंकर धरणीकंप झाला. हजारो लोक मेले, लाखो घरे जमीनदोस्त झाली. गांधींनी भूकंपग्रस्त भागात फिरून लोकांची सेवा केली. गांधींनी शेट जमनालाल बजाज या आपल्या एका थोर अनुयायाच्या सांगण्यावरून वर्धा येथील सेवाग्राम येथे आश्रम स्थापन केला. तेथे ते अखेरपर्यंत राहिले आणि विधायक कार्यक्रमाला पुन्हा त्यांनी वाहून घेतले. त्यांनी १९३८ मध्ये बंगालचा दौरा केला. बंगाल हे सशस्त्र क्रांतिकारकांचे केंद्रस्थान होते. शेकडो सशस्त्र क्रांतिकारक कारावासात खितपत पडले होते. त्यांना ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी विचारविनिमय करून त्यांनी बंधमुक्त केले. प्रांतिक व केंद्रीय निवडणुकींत १९३७ मध्ये बंगाल व पंजाब सोडून बहुतेक प्रांतांमध्ये कॉंग्रेस बहुमताने निवडून आली. सात प्रांतांमध्ये कॉंग्रेस मंत्रिमंडळांचे राज्य झाले होते. दुसरे जागतिक महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. युद्धसहकार्य नाकारून गांधींच्या सल्ल्याप्रमाणे या कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. बॅ.जिनांच्या सल्ल्यानुसार मुस्लिम लीगने कॉंग्रेस मंत्रिमंडळ बरखास्त झाल्यामुळे देशभर मुक्तिदिन साजरा केला. १९४१ च्या एप्रिलमध्ये गांधींनी पुन्हा वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. भारतात शांतता नांदावी व युद्धप्रयत्नाससाहाय्य व्हावे, म्हणून ११ मार्च रोजी भारताला स्वराज्याचे हक्क युद्ध संपल्याबरोबर द्यावेत असे चर्चिल यांच्या मंत्रिमंडळाने ठरवून सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचा आयोग भारताकडे पाठविला. गांधीप्रभृती नेते आणि क्रिप्स यांच्यात वाटाघाटी झाल्या; परंतु त्या अखेर फिसकटल्या. याचे कारण गांधींना युद्धसहकार्य करायचे नव्हते. गांधींनी ब्रिटिशांना विरोध न करण्याचे युद्धारंभीचे धोरण नंतर बदलले होते. म्हणून त्या वेळचे व्हाइसरॉय वेव्हेल यांनी गांधी शब्दाचे पक्के नव्हते, अशा अर्थाचे विधान या संदर्भात केले असावे. गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय कॉंग्रेस

पान ४ वर

## ३१ मार्चपर्यंत सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यालय रहावे - प्रशांत बंब

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



मतदार संघामध्ये शासकीय कर्मचारी काम चुकारपणा करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही - आमदार प्रशांत बंब. सध्या वीज रोहित्र जळणे त्याची अहवाल लाईन मन ने आठ - आठ दिवस न देने, माहिती आल्या नंतर ती अधिकाऱ्यांकडून पुन्हा वरिष्ठ कार्यालयाला पाठविणे.व ना दुरुस्त रोहित्र पाठवणे,गाडी नसणे, गाडी असेल तर ड्राईव्हर नसणे अशा विविध कारणाने विलंब होणे, आणि पुन्हा रोहित्र मिळण्यासाठी किमान एक महिना किंबहुना त्यापेक्षा जास्त काळ लागत आहे. अशा तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. लक्षात घ्या,महावितरणाच्या अधिकारी,कर्मचारी, वायरमन यांनी शेतकऱ्यांची अडवणुक फसवणूक किंवा अरेरावीची भाषा वापरली व कामात कामचुकार पणा केला तर याद राखा.

कामात काम चुकारपणा करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही अशी सूचना आढावा बैठकीत बोलताना आमदार प्रशांत बंब यांनी महावितरणाच्या अधिकारी कर्मचारी यांना दिली. खुलताबाद तालुक्यातील महावितरणाच्या अधिकारी कर्मचारी यांची आढावा बैठक (दि.२९) घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार स्वरुप कंकाळ गटविकास अधिकारी प्रकाश नाईक. तालुक्यातील अतिभार असलेले रोहित्र,जळणे,त्याचा अहवाल वायरमन पासून वरिष्ठ अधिकारी यांच्या पर्यंत लागणार विलंब याची कारणे तपासून अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना संबंधित कामाबाबत कुठलीही अडचण,समस्या आल्या तर त्या तात्काळ त्यांच्या मेल वरती कळवाव्यात व यापुढे जळालेले रोहित्र ४८ तासाच्याआत त्या त्या गावात लावण्यात यावा अशा सूचना करून संबंधित ठेकेदार कामात दिरंगाई करत असेल तर त्यास नोटिसा बजावून काळ्या यादीत टाकण्याच्याही सूचना केल्या.

दरम्यान खुलताबाद तालुक्यातील बाजारसावंगी येथील कनिष्ठ अभियंता काळवंडे हे वारंवार बैठकीस हजर न राहणे, मुख्यालयी न राहणे अशा विविध कारणास्तव त्या त्यांच्या विरोधात कारवाई प्रस्तावित करण्याचे या बैठकीत आदेशीत करण्यात आले.

दरम्यान याच वेळी आ. बंब यांनी खुलताबाद तालुक्यातील विविध घरकुल योजने बाबत बैठक घेऊन मंजूर असलेले,मंजूर असून एकही हप्ता न मिळालेले, पहिला हप्ता मिळाला परंतु काम आणखी अर्धवट आहे अशा सर्व घरकुले पूर्ण करून उद्दिष्ट पुरती करण्याचे आदेश ही त्यांनी पंचायत समिती विभागाला दिले.

यावेळी या बैठकीत तहसीलदार स्वरुप कंकाळ.गटविकास अधिकारी प्रकाश नाईक.भुमिअभिलेख विभागाचे चंद्रकांत सेवक. आर डी बनसोडे.महावितरण विभागाचे शाखा अभियंता उस्मान खान. तसेच सर्व विभागाचे अभियंता व ग्रामसेवक तलाठी यांच्या उपस्थिती होते यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड.भिमराव खंडागळे.भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे. माजी उपसभापती दिनेश अंभोरे शहराध्यक्ष परसराम बारगळ. विकास कापसे. सतीश दांडेकर.संदीप निकम.भागचंद जानेवान.राहुल हजारे. माजी सरपंच कृष्णा चव्हाण.शेख अनिस, संतोष घुसिगे. उमेश आवारे.शेख चांद, संतोष जेटे. अनिल आव्हाड. करण राजपूत.प्रकाश चव्हाण, राहुल निकुंभ, आशिष कुलकर्णी , अनिल घुगे, गोपाल वर्मा, रज्जाक पठाण ,बालु दांडेकर, यांचे सह मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भिवरासिंग साळुंखे यांना मिळाला सन्मान

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित राजधानी दिल्लीत आयोजित केलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून. उपस्थित असलेले इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो यांचे तैलचित्र काढण्याचा मान खुलताबाद येथील आर्टिस्ट भिवरासिंगने मिळवला आहे.हे तैलचित्र प्रबोवो सुबियांतो यांना भारत सरकारच्या वतीने भेट देऊन गौरविण्यात आले आहे.खुलताबाद म्हैसमाळ रोड लागत शतकुंडा आर्ट्स मेटल्स फाउंड्रीचे प्रसिद्ध शिल्पकार दाम्पत्य नरेंद्रसिंग साळुंखे व स्वाती साळुंखे यांची कन्या भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंखे हिला तैलचित्र काढण्याची संधी निखिल मर्चेंट यांनी दिली.भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंखे हिचे

मुंबई येथील सर जे.जे. कला महाविद्यालयात पदवी शिक्षण झाले आहे. भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंखे हिने २०२२ मध्ये बल्गेरिया येथे झालेल्या मिसेस युनिव्हर्सलसाठी भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डॉ.यंदाच्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या नवी दिल्ली येथील सोहळ्यात विशेष पाहुणे म्हणून उपस्थित असलेले इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो यांचे तैलचित्र काढण्याचा मान खुलताबाद येथील आर्टिस्ट भिवरासिंगने मिळवला आहे.लीना गुप्ता यांच्यासाठी कॉस्च्युम तसेच प्रॉप डिझाइन केले होते. सतत सात ते आठ वर्षांचा एगी जास्मिनचा (जकार्ता) प्रथम क्रमांकाच्या मानांकनाचा विक्रम मोडीत काढला.मिसेस युनिव्हर्सल, मिसेस वर्ल्ड,तसेच ज्युरीचा विशेष पुरस्कार सहा आंतरराष्ट्रीय पातळी वरील पुरस्काराने आर्टिस्ट भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंके हिने पटकावले आहेत. आई वडिलांच्या कलेचा वारसा आर्टिस्ट भिवरासिंग साळुंखे या तरुणी आर्टिस्ट यांनी आई वडीलाच्या वारस पुढे चालवत दिसत आहे..

**'महाराष्ट्र मराठा सोयरीक'चा उपक्रम..**

## रविवारी २ फेब्रुवारीला बुलढाण्यात वधू वर पालक बैठकीचे आयोजन

**बुलढाणा (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिवाळी झाल्यानंतर लग्न समारंभाला सुरुवात होते, हे हेरून मराठा समाजातील मुला मुलींच्या लग्नासाठी जुळवणी करता यावी म्हणून श्री मिसाळ यांच्या माऊली हाईट्स, डॉक्टर राजेंद्र गोडे यांच्या निवासस्थानासमोर. व एम एस सी बी च्या बाजूला चिखली रोड बुलढाणा येथे २ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी ठीक १ वाजता महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ श्री अण्णासाहेब म्हळसणे पाटील यांनी केले.

विवाह जुळून येणे ही एक मोठी समस्या झाली आहे. सर्वच जाती समाज घटकातील तरुणांपुढे आज लग्न ही मोठी समस्या आहे. अशा वेळी ही सामाजिक समस्या हेरून महाराष्ट्र मराठा सोयरीक या लोक चळवळीचे संकल्पक श्री सुनील जवंजाळ पाटील यांनी राज्यभर प्रयत्न सुरू केले आहे. शिवजयंतीच्या पर्वावर १९ फेब्रुवारीला बोदवड जि जळगाव येथे मेळाव्याचे आयोजन केलेले आहे.राजकारण विरहित कार्य त्यांनी गेल्या कितीतरी वर्षापासून सुरूच ठेवले आहे. समाज घटकातील सर्वच मुला-मुलींना योग्य स्थळ मिळावे यासाठी त्यांचा प्रयत्न नाविन्यपूर्ण ठरला आहे. महिन्याच्या प्रत्येक पहिल्या रविवारी वधु वर पालक बैठकीचे आयोजन बुलढाण्यात करण्यात येते. ठरल्यानुसार बुलढाणा येथे चिखली रोड येथील डॉक्टर गोडे यांच्या निवासस्थान समोर, माऊली हाईट्स बिल्डिंगमध्ये २ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी ठीक १ वाजता ही बैठक होत आहे. या बैठकीमध्ये विवाह इच्छुक मुला मुलींच्या पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. या बैठकीला मराठा सोयरीकचे मान्यवर मार्गदर्शन सुद्धा करणार आहेत. बैठकीला येताना पालकांनी आपल्या पाल्यांचे बायोडाटा सोबत आणावे. ५ जानेवारीला बुलढाणा येथे संपन्न झालेल्या वधू वर परिचय मेळाव्यातील बायोडाटा ही त्यांना बघता येतील.

बैठकीमध्ये बोदवड शहरामध्ये शिव जयंती पर्वावर लवकरच होऊ घातलेल्या वधू वर परिचय मेळाव्याचे प्रचाराचे नियोजन करण्यात येईल.

## पोलिस दलात उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांचा विशेष सेवा सत्कार



**लातूर, अमरजीत बनसोडे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लातूर दिनांक २६ जानेवारी पोलीस अधीक्षक कार्यालय येथील जिल्हा पोलीस विशेष शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक सुधाकर मुरलीधर बावकर यांना लोकसभा निवडणूक काळातील सर्व अति महत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे बंदोबस्त, योजना व गुप्तवार्ता संकलन या कार्यासाठी पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते विशेष सेवा सत्कार करण्यात आला आहे.

जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या वतीने जिल्ह्यातील पोलीस विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना विशेष सेवा सत्कार करून गौरविण्यात आले असून जिल्हा पोलीस विशेष शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक सुधाकर मुरलीधर बावकर यांना लोकसभा निवडणूक काळातील सर्व अति महत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे बंदोबस्त, योजना व गुप्तवार्ता संकलन या कार्यासाठी पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते विशेष सेवा सत्कार करण्यात आला आहे यावेळी जिल्हाधिकारी सौ वर्षा ठाकूर घुगे व पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांची उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक सुधाकर मुरलीधर बावकर हे राज्यातील विविध ठिकाणी आपली सेवा कार्य उल्लेखनीय राहिलेले आहे त्यांनी अनेक गंभीर गुन्ह्यातील तपास अत्यंत जलद गतीने पूर्ण केला असून जिल्ह्यात गुन्हेगारी क्षेत्रात त्यांचा मोठा दबदबा आहे. यावेळी पोलीस उपाधिक्षक गृह गजानन भातलवंडे, पोलीस हवालदार अजय शिंदे, महादेव शिंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी यांनाही प्रशस्तीपत्र देण्यात आले आहे

## सत्येंद्र कुलकर्णी यांना 'महाराष्ट्र उद्योग रत्न' पुरस्कार प्रदान

**छत्रपती संभाजीनगर/खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**




प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अनमोल मल्टी सर्व्हिसेसचे प्रोप्रायटर सत्येंद्र सुरेश कुलकर्णी यांना 'महाराष्ट्र उद्योग रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी पंडीत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



सत्येंद्र कुलकर्णी यांनी महाराष्ट्रात उत्कृष्ट सुरक्षा रक्षक व आंग रक्षक ( बाउन्सर) व मनुष्यबळ.विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक या एजन्सी मार्फत पुरवठा या करण्यात आले आहे क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. या अनमोल मल्टी सर्विसेस कंपनीच्या सुरक्षा रक्षक राज्यभरात दर्जेदार सुरक्षा सेवा पुरवत आहे. विशेष म्हणजे, खुलताबाद तालुक्यातील वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात देखील या अनमोल मल्टी सर्विसेस कंपनीच्या अंतर्गत ४० सुरक्षा रक्षक रात्र दिवस तैनात आहेत.

या गौरवामुळे सत्येंद्र कुलकर्णी व त्यांच्या संपूर्ण टीममध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल घृष्णेश्वर देवस्थानाचे विश्वस्त मंडळ पदाधिकारी तसेच वेरूळ येथील ग्रामस्थाच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्री घृष्णेश्वर महादेव मंदिराची सुरक्षेची जबाबदारी त्यांनी महाशिवरात्री व उत्सव काळात व्यवस्थित पाडली होती. तरीही त्याच्याक्डून भाविकांना अपेक्षा आहेत की, आपण तेथे दलालीच्या माध्यमातून घेवून येणाऱ्या कोणत्याही भाविकाला सोडले नाही पाहिजे.

दर्शनासाठी भाविकांची लूट हे तेथे काही नवीन नाही आहे त्यासाठी जर जबाब दार लोकच भ्रष्ट असतील तर सुरक्षा यंत्रणा काय करणार असो, विषय पुरस्काराचा असल्याने सत्येंद्र सुरेश कुलकर्णी यांना 'अट्टल मत' व दै. 'अट्टल संकेत'च्या परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!

## जरांगेंचं उपोषण स्थगित; मागण्या मान्य न केल्यास मुंबईत आंदोलन

**जालना (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे यांचं उपोषण आता स्थगित करण्यात आलं आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्युस दिला आणि त्यांचं उपोषण सोडवलं.

सुरेश धस यांच्या हस्ते ज्यूस घेत उपोषण स्थगित - सरकारचे प्रतिनिधी म्हणून अंतरवाली सराटीत आलेल्या आमदार सुरेश धस यांच्याहस्ते ज्यूस पिऊन मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली. मात्र, याचवेळी सरकारने आमच्या मागण्यांसदर्भात लवकरच निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलन राजधानी मुंबईत करणार असून त्याचीही घोषणा केली जाईल, असा इशाराच सरकारला दिला आहे. आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे आणि प्रकाश सोळंकी यांच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांनी ज्यूस पिऊन उपोषण सोडलं. यावेळी, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेही उपस्थित होते.

**मनोज जरांगेंनी काय म्हटलं?**

काही लोक म्हणत आहेत की मनोज जरांगेंच्या उपोषणातून काय मिळाल? पण त्यांचा २४ तास एकच धंदा आहे, त्यांना काही करायचं नाही. राज्य सरकारकडून शिंदे समिती पूर्णपणे बंद करण्यात आली होती. शिंदे समितीच्या मंत्रालयावरील ऑफिसला कुलूप लावण्यात आलं होतं, जे काय मिळालं म्हणत होते ना? घरात बसून नेत्यांचे पाय चाटणाऱ्यांना काय मिळालं ते कळणार नाही, असा टोला काही मराठा समन्वयकांना जरांगे पाटील यांनी लगावला. आता शिंदे समिती राज्यात काम करणार आहे, पूर्ण राज्य आमचं आहे. पण, बीड आणि धाराशिव जिल्ह्यात काही अधिकारी जातीयवादी आहेत, ते मराठा समाजातील तरुणांना प्रमाणपत्र देत नाहीत, त्यांना बडतर्फ केलेलंच बरं असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

**सगे-सोयऱ्यांची अमलबजावणी न केल्यास मुंबईत आंदोलन**

सग्या सोयऱ्यांची अमलबजावणी आम्हाला पाहिजेच आहे. ती झाली नाही तर आता लवकरच मुंबईतल्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले. मुंबईत जर आंदोलन सुरु केलं तर तिथून काही माघार घेणार नाही.आपल्याला मुंबईला पोलिसांनी मारलं तरीही पोलिसांना बोट लावायचं नाही. पण, मंत्र्यांना आणि त्यांच्या पोरांना धरायचं आणि हाणायचं असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला. तसेच, आता हे आंदोलन स्थगित करत आहे, या जागेवर सभामंडप करायचा आहे. यापुढे शक्यतो आता उपोषण करायचं नाही, समोरासमोर लढायचं आहे. लवकर अमलबजावणी न झाल्यास मुंबईची तारीख जाहीर करेन, तेव्हा मुंबई जाम होऊ शकते, यावेळी मराठे मागे येऊ शकत नाहीत, असंही मनोज जरांगे म्हणाले.

### मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया

मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांपासून लढा देत असलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आपले उपोषण मागे घेतले आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्यूस देऊन हे उपोषण सोडवले. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांचे आंदोलन आणि त्यांच्या मागण्यांसंबंधी प्रतिक्रिया दिली आहे.



देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?

मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडलं याचा आनंद आहे असे फडणवीस म्हणाले. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ङ्गआम्ही मराठा समाजाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत ते महायुतीच्या सरकारनेच घेतले आहेत. हे सगळे निर्माण झालेले प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवणं ही आमची जबाबदारी आहे, आम्ही तो प्रयत्न करतोय.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कायद्याच्या चौकटीतील ज्या ज्या मागण्या ते करतील किंवा कोणीही करेल त्या मागण्या आम्ही निश्चित मान्य करू. पण आमचं म्हणणं एवढंच आहे की, भारताचे संविधान आणि कायदा यांच्या चौकटीतील मागण्या असल्या पाहिजेत. त्या असल्या तर योग्य प्रतिसाद सरकारकडून मिळेल.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत लोकशाही दिन ३ फेब्रुवारी रोजी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. माहे फेब्रुवारी २०२५ चा 'महानगरपालिका लोकशाही दिन' सोमवार दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष, येथे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारीत परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज दिलेल्या नागरीकांनाच दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील, याची नोंद घ्यावी.

ज्यांनी यापुर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणांत अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे उप आयुक्त तथा मुख्य समन्वयक लोकशाही दिन लखीचंद चव्हाण यांनी कळविले आहे.

# कुंभचे मानसिक दृष्टिकोनातून महत्त्व

कुंभमेळा भारतीय महान संस्कृती आणि श्रध्देचे प्रतीक आहे. त्याचे महत्त्व केवळ आध्यात्मिकतेपुरते मर्यादित नाही, तर ते मानसिक स्वास्थ्य, आत्मचिंतन आणि सामूहिक उर्जेचा अनुभव घेण्याचे एक अद्वितीय व्यासपीठ आहे. लाखो श्रद्धाळू आणि साधक जेव्हा या मेळ्यात सहभागी होतात, तेव्हा ते त्यांच्या मन, बुध्दी आणि आत्म्याच्या शुद्धीच्या दिशेने वाटचाल करतात. या वर्षीचा महाकुंभ असल्याने, तो मानवाच्या मनावर अधिक सकारात्मक प्रभाव पाडणारा आहे.

कुंभ मेळ्याचे भक्तिमय वातावरण म्हणजे सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक शांततेचा स्रोत आहे. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या संगमावर स्नान केल्याने आत्म्याची शुद्धी आणि पापांपासून मुक्ती मिळते, अशी श्रद्धा आहे. ही धार्मिक आस्था मनाला नकारात्मकतेपासून मुक्त करते आणि मानसिक शांतता आणि स्थैर्य प्रदान करते.

कुंभ मेळ्यात कोट्यवधी लोक सामूहिकपणे ध्यान, प्रार्थना आणि भक्तीत लीन होतात. या सामूहिक साधनेतून मिळणारी सकारात्मक ऊर्जा एक अद्वितीय मानसिक अनुभूती देते. अशा सोहळ्यांमध्ये सहभागी झाल्याने व्यक्तीला दैनंदिन जीवनातील ताणतणाव आणि चिंतांपासून मुक्ती मिळते. जीवनाला नवीन दिशा मिळते. उदाहरण बघायचे तर एका विदेशी चित्रकाराने सांगितले की, ते कुंभ मेळ्यात रंगांचा संगम पाहण्यासाठी आले होते, परंतु येथे आल्यानंतर येथील भक्ती, श्रद्धा, अनुष्ठान, संघटन, आपुलकी, सांस्कृतिक महानता यामुळे ते प्रभावित झाले. त्यांनी भारतीय आध्यात्मिक मूल्ये जाणून घेतली आणि त्या मार्गावर चालण्यास सुरुवात केली. असे अनेक अनुभव कुंभ मेळ्यात बघायला मिळतात. हे सामूहिक उपासनेचे आणि संघ भावाचे सकारात्मक परिणाम आहेत.

कुंभ मेळ्यात दररोज साधू-संत आणि विद्वानांचे प्रवचन असतात. सामूहिक अनुष्ठान, नामजप आदी अखंडपणे सुरू असत. यामुळे इथे येणाऱ्याचे मन स्थिर होण्यास मदत होते. संतांच्या जीवनदर्शन आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाने व्यक्तीला जीवनातील समस्यांना सामोरे जाण्याची दिशा मिळते. व्यक्तीतील विवेक जागृत होतो. त्यामुळे जीवनातील गुंतागुंती समजून घेण्यासाठी आणि त्यावर सोपे उपाय शोधण्यासाठी प्रेरणा मिळते. श्रद्धा वाढल्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो. ज्यामुळे तो जीवनातील आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. कुंभ मेळ्याचा अनुभव व्यक्तीला आत्मचिंतन आणि आत्मिक विकासाच्या दिशेने प्रेरित करतो. व्यक्तीच्या अंतर्मुखतेत वाढ होऊन जीवनातील व्यापक दृष्टिकोन तयार होतो. हा मेळा केवळ धार्मिक नाही, तर मानव जीवनाचा उद्देश समजून घेण्यासाठी आणि आत्म्याच्या उन्नतीसाठी एक व्यासपीठ आहे. आत्मचिंतन हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे, आणि कुंभमेळा यासाठी एक अप्रतिम संधी प्रदान करतो. देश-विदेशातील उद्योजक, कलाकार, वैज्ञानिक इत्यादी येथे आत्मचिंतन करण्यासाठी येतात. येथे आल्यावर त्यांना जीवनात सकारात्मक बदलांचा अनुभव येतो.

कुंभ मेळा विविध संस्कृती आणि समाजातील लोकांना एकत्र आणतो. हा अनुभव मनाला व्यापक करणारा आहे. विविध भागातून आलेल्या लोकांशी संवाद साधल्याने आणि सहभाग घेतल्याने व्यक्ती मानसिकदृष्ट्या सशक्त होते आणि सामाजिक जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक होते. सर्व लोक आपापल्या जाती, धर्म, पद, संप्रदाय यापेक्षा केवळ हिंदु म्हणून कुंभमेळ्यात सहभागी होतात. त्यामुळे इथे भारतातील विविध संस्कृती आणि उपसना यांचा संगम अनुभवायला मिळतो. कुंभमेळा म्हणजे सामुदायिक एकतेचा आविष्कार म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

त्रिवेणी संगमाच्या तीरावर असलेल्या कुंभ मेळ्याचे नैसर्गिक वातावरण मनाला शांतता आणि आनंद देते. पाणी, डोंगर, आणि मोकळ्या आकाशात व्यतीत केलेला वेळ मानसिक समाधानाचा अनुभव देतो. या नैसर्गिक सौंदर्यामुळे व्यक्ती तणावमुक्त होतो आणि मानसिक ऊर्जा प्राप्त होते. हे बघता कुंभ मेळा केवळ एक धार्मिक उत्सव नाही, तर तो मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी एक अद्वितीय पर्वणी आहे. येथील वातावरण, साधू-संतांचे मार्गदर्शन, आणि सामूहिक भक्ती इत्यादी व्यक्तीला मानसिक स्थिरता, शांतता आणि नवीन ऊर्जा प्रदान करतात. कुंभ मेळ्याचा अनुभव जीवनाला नवी दृष्टी, संतुलन आणि सकारात्मकता प्रदान करणारा एक प्रभावी मार्ग आहे. या कुंभमेळ्यातील मिळाली ऊर्जा टिकून राहण्यासाठी आणि मानवाचे मनःस्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी धर्मरक्षण होणे गरजेचे आहे. परंतु सध्या सर्वत्र हिंदु धर्मावर आघात होत आहेत. त्यासाठी हिंदूंनी संघटित होणे आणि धर्म रक्षणासाठी संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे. याविषयीचे मार्गदर्शन करणारे प्रदर्शन हिंदू जनजागृती समितीतर्फे महाकुंभ क्षेत्री लावण्यात आले आहे.

कैलाशपुरी भारद्वाज मार्ग चौक, भारद्वाज पोलीस ठाण्याच्या मागे, सेक्टर ६, कुंभ क्षेत्र, प्रयागराज येथे १० जानेवारी २०२५ ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान, सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत आयोजित केले आहे.सर्व भक्तांनी आणि जिज्ञासूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. या प्रदर्शनाला भेट देऊन, राष्ट्र आणि धर्माशी संबंधित शंकांचे निरसन करून घ्यावे.

# जिल्हा विकास आराखड्यात कौशल्य प्रशिक्षणास प्राधान्य द्यावे- पालक सचिव हर्षदीप कांबळे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हा विकास आराखड्यामध्ये उद्योगाला आवश्यक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ पुरवण्यासाठी प्रशिक्षण उपलब्धतेला प्राधान्य द्यावे तसेच वस्तुनिष्ठ उपाययोजनांचा समावेश जिल्हा विकास आराखड्यात करावा,असे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव तथा सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी आज दिले.

जिल्हा विकास आराखडा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत ,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भरत वायाळ, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाचे सहाय्यक आयुक्त सुरेश वराडे, जिल्हा दुग्धविकास अधिकारी मनीषा हराळ, कृषी ,उद्योग, महिला बालविकास विभागाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक होत असून 'ऑटोहब' म्हणून ओळख निर्माण होत आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी कौशल्य विकास, तंत्रनिकेतन, उद्योग यांनी समन्वयाने विविध कौशल्य



आधारित प्रशिक्षण राबवून कुशल मनुष्यबळ उपलब्धता करण्याच्या उपाययोजनांचा नियोजन आराखड्यात समावेश करावा.

उत्पादन, निर्यात,पर्यटन, स्थानिक लघुउद्योग, वितरण व्यवस्था, कृषी यासह निर्यात क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. खाजगी संस्थांचे सहकार्य आवश्यक तेथे घेण्यात यावे. लॉजिस्टिक पार्क तयार करुन साठवण क्षमता वाढवणाऱ्या गोदामांची निर्मिती करण्यात यावी. शेतमालावर प्रक्रिया करण्यासही वाव आहे. त्यात मका, भाजीपाला, फळ प्रक्रिया यासारख्या उद्योगाची जास्तीत जास्त युनिट स्थापन करून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करण्यात येईल. पर्यटन वाढीसाठी उपलब्ध दळणवळण व्यवस्थेबाबतही पोलीस,जिल्हा प्रशासन, हवाई वाहतूक व सर्व वाहतूक यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. रस्ते अपघात टाळण्यासाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा. स्टार्टअप कंपन्यांद्वारे रोजगार उपलब्ध करण्याचा जिल्हा विकास आराखड्यात समावेश करावा,असेही त्यांनी सांगितले.

# भारतीय बौद्ध महासभेचा एक उल्लेखनीय आणि ऐतिहासिक उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय प्रशिक्षण विभागाद्वारे आयोजित धम्म लिपी अभ्यासक्रम (अशोक कालीन व सातवाहन कालीन) ऑनलाइन कार्यशाळेच्या माध्यमातून दि. २१/८/२०२४ ते ३०/१०/२०२४ या काळात यशस्वीरित्या पूर्ण करून लेखी परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या सर्व विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रमाणपत्र देण्यात आले.

या लेखी परीक्षेमध्ये मी 'अ +' ही ग्रेड संपादित केली. हा कार्यक्रम 'चैत्यभूमी, दादर, मुंबई' येथे पार पडला.



भारतीय बौद्ध महासभेचे विश्वस्त तसेच राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर सर यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी अॅड.एस. के. भंडारे सर - राष्ट्रीय उपाध्यक्ष मुंबई, केंद्रीय कार्यालय प्रमुख, अॅड.एस.एस. वानखेडे सर - राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख तसेच दयानंद बडेकर सर मुं. सरचिटणिस, यांची विशेष उपस्थिती होती.

आमच्या धम्म लिपी वर्गाच्या धम्म लिपी प्रमुख शिक्षिका आदरणीय स्वातीताई गायकवाड यांनी अभ्यासक्रमाची पूर्वतयारी ते अगदी प्रमाणपत्र आमच्या हातात मिळेपर्यंत खूपच मेहनत घेतली. नागपूर वरून खास या कार्यक्रमासाठी करुणाताई मून, करूनाताई गोडबोले आणि मीनाताई बागडे या सहाय्यक शिक्षिका उपस्थित होत्या. वरील सर्व आदरणीय सर आणि मॅडम यांच्या अथक मेहनतीमुळे आम्ही धम्म लिपीचा हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकलो.

सर्वांचे खूप खूप धन्यवाद.

पान २ वरून

# गिरीजन- हरिजनांची मने जिंकणारे महात्मा गांधी

समितीची मुंबई येथे बैठक बोलाविली. त्या बैठकीत त्यांनी भारत स्वतंत्र झाला आहे, असा निर्णय जाहीर केला आणि छोडो भारत आंदोलन देशभर सुरू केले. गांधींनी लोकांना सांगितले, की करा किंवा मरा. ९ ऑगस्ट रोजी गांधींसह शेकडो नेत्यांची धरपकड झाली आणि त्यांना कारागृहात डांबण्यात आले. गांधींना पुणे येथील आगाखान बंगल्यात स्थानबद्ध केले. त्यांच्याजवळ कस्तुरबा, महादेव देसाई, डॉ.गिल्डर, डॉ.सुशील नायर, सरोजिनी नायडू इत्यादींना ठेवले. महादेव देसाई हे गांधींचे चिटणीस. त्यांना तेथेच मृत्यू आला. गांधींच्या पत्नी कस्तुरबा या हृदयविकाराने आजारी होत्या. दि.२२ फेब्रुवारी १९४३ रोजी त्यांना मृत्यू आला. या अत्यंत प्रियजनांचा वियोग गांधींनी मोठ्या धैर्याने सहन केला. कस्तुरबांनी गांधींबरोबर मोठ्या निष्ठेने आदर्श पतिव्रता म्हणून जीवन व्यतीत केले. दि.६ मे १९४४ साली गांधीजींची बिनशर्त मुक्तता झाली. दि.२ ऑक्टोबर १९४४ रोजी एक कोटी बारा लाखांचा कस्तुरबा निधी सेवाग्राम येथे गांधींच्या स्वाधीन करण्यात आला. काँग्रेस कार्यकारिणीचे जवाहरलाल नेहरूप्रभृती सभासद व अन्य नेते यांची जून १९४५ मध्ये कारागृहातून मुक्तता झाली. सन १९४६मध्ये इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे मंत्रिमंडळ अ‍ॅटली यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले. त्यांनी मे १९४६ मध्ये भारताच्या स्वराज्याची योजना तयार केली. संविधान परिषद व हंगामी राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविण्याचा अधिकार भारताला त्या योजनेप्रमाणे मिळाला. दि.२९ जुलै १९४६ रोजी मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या मागणीकरिता आंदोलन उभारले. भारताची फाळणी अपरिहार्य झाली. गांधींना ती मुळीच मान्य नव्हती. एक वेळ माझ्या देहाचे दोन तुकडे पडले तरी चालेल, पण भारताची फाळणी मी होऊ देणार नाही, असे गांधींनी जाहीर केले. परंतु दि.३ जून १९४७ रोजी जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल इ.नेत्यांनी भारताची फाळणी मान्य केली. या सुमारास हिंदु-मुसलमानांचे यादवी युद्ध देशभर पेटले.

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा
निकोडे गुरूजी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त दूरध्वनी: ७७७५०४१०८६.

# जिल्हा नियोजन समिती बैठक ; लोकसंख्येची वाढ गृहित धरुन नियोजन करावे- पालकमंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करतांना लोकसंख्येची वाढ गृहित धरावी. जिल्ह्यात होऊ घातलेली औद्योगिक गुंतवणूक, त्यानिमित्ताने रोजगार, व्यवसायासाठी येणाऱ्या लोकांची संख्या, होणारा विस्तार लक्षात घेऊन जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन तयार करावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले. यावेळी सन २०२५-२६ साठी तयार करण्यात आलेल्या १३५४ कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली.

जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक आज नियोजन सभागृहात पार पडली. बैठकीस विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संदिपान भुमरे, डॉ. कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य आ. राजेश राठोड, विधानसभा सदस्य आ. अब्दुल सत्तार, आ. प्रदीप जयस्वाल, आ. प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, आ. अनुराधाताई चव्हाण, आ. संजनाताई जाधव तसेच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर आदी उपस्थित होते.




बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात सन २०२४-२५ साठी मंजूर नियतव्यय सर्वसाधारण ६६० कोटी रुपयांचा आहे. त्यात गाभा क्षेत्र ४५० कोटी ९१ लक्ष रुपये, बिगर गाभा क्षेत्र १८० कोटी ५८ लक्ष रुपये तर नियोजन आराखड्यातील योजनांव्यतिरिक्त योजना २८ कोटी ५१ लक्ष असे एकूण ६६० कोटी रुपये मंजूर नियतव्यय आहे.

तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०४ कोटी तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांसाठी ९ कोटी ९० लक्ष रुपये असे एकूण ७७३ कोटी ९० लक्ष रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे.

सन २०२५-२६ करीता तयार करण्यात आलेल्या आराखड्यात सर्वसाधारणसाठी गाभा क्षेत्रात ७६० कोटी रुपये, बिगर गाभा क्षेत्रासाठी ३८० कोटी तर नियोजन आराखड्यातील योजनांव्यतिरिक्त योजनांसाठी ६० कोटी असे एकूण १२०० कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा तयार करण्यात आला आहे.

गेल्या वर्षाच्या नियतव्ययाच्या तुलनेत मागणी रक्कम ५४० कोटी रुपयांनी जास्त आहे. त्याच प्रमाणे अनुसूचित जाती उपयोजनांसाठी १४४ कोटी ६० लक्ष रुपयांचा तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांसाठी १० कोटी ६ लक्ष रुपयांचा असा एकूण १३५४ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

सन २०२४-२५ वर्षाच्या मंजूर नियतव्ययातील डिसेंबर २०२४ अखेर खर्चाचा आढावा घेण्यात आला. सन २०२४-२५ साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांचा मिळून ७७३ कोटी ९० लक्ष रुपयांचा नियतव्यय मंजूर असून त्यापैकी आतापर्यंत ४३४ कोटी ३४ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ५३१ कोटी ७६ लक्ष रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून २४० कोटी ७८ लक्ष रुपयांचा निधी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी १८८ कोटी २८ लक्ष रुपयांचा निधी खर्च झाला आहे,अशी माहिती देण्यात आली.

बैठकीत पालकमंत्री शिरसाट यांनी निर्देश दिले की, शाळांसाठी चांगल्या इमारती बांधकाम करण्यासाठी नव्याने कृती आराखडा तयार करावा. जेणेकरुन नव्या इमारती उपलब्ध होतील. नव्याने जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करतांना लोकसंख्या वाढ हा मुद्दा लक्षात घ्यावा.

अधिकाधिक ठिकाणी सौर उर्जा निर्मितीची यंत्रणा बसविण्यास चालना द्यावी. ग्रामिण भागात स्मशानभुमी बांधण्यासंदर्भात एक सर्व्हेक्षण करुन महिनाभरात आराखडा तयार करावा.

शाळांमध्ये मुलींच्या शिक्षण व सुरक्षेसंदर्भात अधिकाधिक दक्षता घेऊन त्वरीत कारवाई करणे अपेक्षित आहे.

पाच वर्षाचा जिल्हा विकास आराखडा देखील पालक सचिव हर्षदीप कांबळे यांनी राबवण्याच्या सूचना सभागृहाला दिल्या व त्यास देखील जिल्हा नियोजन समिती ने मान्यता प्रदान केली.

बैठकीत जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था, गौणखनिज, वीज वाहिन्या व रोहित्र जोडण्या, पाणी उपलब्धता अशा विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. चर्चेत सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. बैठकीनंतर पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सामाजिक न्याय दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816